
# पंचधारा

वर्ष ६८ वे, अंक चौथा
जानेवारी २०२६ ते मार्च २०२६
पौष ते फाल्गुन शके १९४७

Peer/Referee reviewed by UGC




## भालचंद्र महाराज कहाळेकर

जन्म : ४ एप्रिल १९१७ • मृत्यू : २८ मे १९७५

संस्थापक : मराठी मंडळ, हैदराबाद

तोडा, चिरा दुग्धधाराच येती
न हे रक्त वाहे शरीरातुनी
"माझी मराठी, मराठाच मीही"
असे शब्द येतील हो त्यातुनी ॥

मराठवाडा साहित्य परिषद
२९ सप्टेंबर १९४३

मराठी साहित्य परिषद,
आंध्र प्रदेश
१९५८

मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य, हैदराबाद
RNI Reg. No. 32307/79
मूल्य : रु. १७५/-

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ पुरस्कृत
मराठी साहित्य परिषद, (तेलंगण राज्य) या संस्थेचे त्रैमासिक मुखपत्र

# पंचधारा

## कै. भा. शं. कहाळेकर विशेषांक

वर्ष ६८ वे, अंक चौथा

जानेवारी २०२६ ते मार्च २०२६
पौष ते फाल्गुन शके १९४७

### संपादक मंडळ

डॉ. विद्या देवधर (प्रमुख संपादक)
माधव रामराजे चौसाळकर
डॉ. शैलजा जोशी
मीना जहागिरदार
व्यंकटेश कुलकर्णी
डॉ. गायत्री शिरोळे

**मराठी साहित्य परिषद, तेलंगण राज्य**
इसामिया बाजार, हैदराबाद – ५०० ०२७
RNI Reg. No. : 32307/79



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


संपादकीय ........................................................................ ५

**श्रद्धांजली**

- पन्नालाल सुराणा ........................... डॉ. नयना जोशी-देशपांडे ....... ७
- एक उमदे व्यक्तिमत्व - जिलानी बानो ...................................... १२

**प्रबोधनाच्या वाटेवर**

- श्री अरविंदांची स्वप्ने व आपले जीवनवास्तव ....................... डॉ. वृंदा देशपांडे-जोशी ...... १३
- मुस्लीम सत्यशोधक आणि समाजप्रबोधन . डॉ. बेनझीर तांबोळी ......... २१

**भालचंद्र महाराज कहाळेकर आदरांजली**

- भालचंद्र महाराज कहाळेकर - काही आठवणी ............................ प्रा. न. गो. राजूरकर ......... २९
- मर्मबंधातली ठेव ............................ मधू जामकर.................. ३२
  शब्दांकन : अश्विनी अयाचित
- प्रा. भालचंद्र महाराज कहाळेकर - एक फणसाळ व्यक्तिमत्त्व ................ भारत देगलूरकर ............... ३६
- 'मराठी साहित्य परिषद'चे शिल्पकार कै. कहाळेकरकाका उर्फ भालचंद्र महाराज कहाळेकर ............... प्रतिभा जोशी ................. ३८
- भालचंद्र कहाळेकरांच्या आठवणी ......... मीना मनसबदार ............... ४२
- प्रा. भालचंद्र कहाळेकर सर - स्मृतिगंध ... प्रा. श्रीमती प्रभा रामकृष्ण नान्नजकर ............... ४७
- अनिलांची कविता - 'सांगाती'च्या निमित्ताने ..................... मीना मनसबदार .............. ५०

**कहाळेकर पंचधारा विशेषांक १९७५ : निवडक लेख**

- संपादकीय : भालचंद्र महाराज कहाळेकर आदरांजली... अनंत अरगडे ............... ६२





Scanned with OKEN Scanner

- हैदराबादेतील मराठी समाजाचे सुहृद श्री. भा. शं. कहाळेकर ..................... गो. अ. एकबोटे ............. ६३
- मी पाहिलेले कहाळेकर ..................... न. शे. पोहनेरकर............. ६६
- 'वाङ्मयी तपी' श्री. कहाळेकर ............ प्रा. नरहर कुरुंदकर ........... ७०
- अर्घ्य तुज जोडुनि दोन्ही करा ............. यशवंत कानिटकर ............ ७७
- कहाळेकर : अजोड कार्यकर्ता............ प्रा. व्यं. द. टिळक ........... ७९
- मराठी साहित्य महामंडळ आणि प्रा. कहाळेकर.............................. श्री. शं. नवरे ................. ८३
- मी पाहिलेले भालचंद्र महाराज कहाळेकर .. डॉ. सुरेंद्र बारलिंगे ........... ८५
- निर्मळ मनाचा स्नेही - भा. शं. कहाळेकर ......................... भगवंतराव देशमुख .......... ९१
- जी. ए. कुलकर्णी यांची लघुकथा - काही विशेष ............................ भा. शं. कहाळेकर ........... ९२


**वेध विदेशी भाषांचा – साहित्याचा**


- विज्ञान आणि संवेदनशीलता यांचा आदर्श वस्तुपाठ - रिचर्ड फेनमन ......... चिन्मय रहाळकर........... १०२


**ग्रंथपरीक्षणे**


- आनंदाचे डोही आनंद तरंग ................ डॉ. न. गो. राजूरकर ........ १०८
- एक भाकर तीन चुली : जगण्याचा संघर्ष आणि स्त्रीचे अस्तित्व .... डॉ. अमोल सुभाष कवडे ... १२०


**कार्यवृत्त**


- सीतेची गोष्ट - स्त्रीच्या अंतर्मनाचा शोध ... अरुण डवलेकर ............ १२४
- दूर अनावर - एक सुरेल संगीत अनुभव ... अरुण डवलेकर ............ १२७
- श्रीराम शिधये - विज्ञानप्रेमी साहित्यिकाची विशेष भेट ...... उज्ज्वला धर्म ............... १२९

स्वागत नव्या पुस्तकांचे ............................................................. १३२
लेखक परिचय ......................................................................... १३३


Scanned with OKEN Scanner

ग्रंथ परीक्षण - २

# एक भाकर तीन चुली : जगण्याचा संघर्ष आणि स्त्रीचे अस्तित्व

डॉ. अमोल सुभाष कवडे



साहित्यातून समाजाचे, संस्कृतीचे, व्यवहारांचे आणि संघर्षांचे प्रामाणिक चित्रण घडत असते. वास्तवाला भिडणाऱ्या, अंतर्मनाला स्पर्श करणाऱ्या आणि जीवनाच्या तळाला स्पर्श करणाऱ्या काही साहित्यकृती मनात खोलवर रुतून बसतात. देवा झिंजाड यांची 'एक भाकर तीन चुली' ही कादंबरी त्याच पठडीतली आहे.

अलीकडच्या काळात अनेकदा वाचनसंस्कृती लोप पावत आहे असा सूर निघताना दिसतो. सोशल मीडियाचा अतिरेक, व्हिडिओ क्लिप्सच्या माध्यमातून मनोरंजन मिळवण्याची प्रवृत्ती आणि क्षणभंगुर कंटेंटच्या सवयीमुळे खऱ्या अर्थाने विचारप्रवृत्त करणारे वाचन झपाट्याने कमी होत चालले आहे. परंतु याच काळात 'एक भाकर तीन चुली' यासारख्या कादंबरीला लाभलेला भरघोस प्रतिसाद आपल्याला सांगून जातो की, वाचनसंस्कृती संपलेली नाही. फक्त ती हृदयाला भिडणाऱ्या आशयाची वाट पाहत आहे.

ही कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर अवघ्या अठरा महिन्यांत पंचवीस आवृत्त्या, सतरा राज्यस्तरीय पुरस्कार, पाच हजारांहून अधिक वाचकांचा अभिप्राय, तिच्यावर २५० पानांचा समीक्षात्मक ग्रंथ, तसेच हिंदी व इंग्रजी अनुवादाचा प्रारंभ ही सर्व आकडेवारी केवळ तिच्या लोकप्रियतेचे नव्हे, तर तिच्या अंतःसत्त्वाचे द्योतक आहे..

'एक भाकर तीन चुली' या कादंबरीने स्त्रीजीवनातील संघर्षाचे अत्यंत हृदयस्पर्शी, वास्तववादी आणि सशक्त चित्रण करून देवा झिंजाड यांनी वाचकवर्गाला विचारप्रवृत्त तर केलेच आहे शिवाय मराठी साहित्यामध्ये एका दर्जेदार साहित्यकृतीची भर घातली आहे. पितृसत्ताक समाजव्यवस्थेच्या नाकावर टिच्चून, येईल त्या संकटांना निर्भीडपणे दोन हात करणाऱ्या एका खंबीर स्त्रीची, वाचकांच्या मनाला चटका लावणारी कलाकृती म्हणजे 'एक भाकर तीन चुली'. मराठी कादंबरीच्या संदर्भात बोलायचे झाले तर 'स्त्रीसंघर्षाचा परीघ छेदणारी साहित्यकृती म्हणजे एक भाकर तीन चुली' असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. नाळ तुटताक्षणी सुरू झालेली पारूच्या जीवनाची परवड कादंबरी संपली तरी



Scanned with OKEN Scanner

संपलेली नाही. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत मुलगी जन्माला येणे हे दुय्यमच मानले जाते. पारूच्या बाबतीतही तसेच झाले. पारूचा जन्म झाला आणि तिच्या आजीआजोबांनी तिच्या आईला त्रास द्यायला सुरुवात केली आणि तिथूनच पारूच्या संघर्षाला सुरुवात झाली. खेळण्याबागडण्याच्या वयात म्हणजे अवघ्या दहाव्या वर्षी आजोबांनी पैसे घेऊन लंगड्या आणि वयस्कर दगडूसोबत लग्न लावून दिले आणि लग्नानंतर फक्त २८व्या दिवशी दगडूचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूला पारूला जबाबदार धरले जाते. दशक्रियेसाठी आलेल्या पारूच्या आईवडिलांना पारूची सासू म्हणजे शेवंता फणकाऱ्याने म्हणते की, 'ह्या टवळीमुळं मप्ला ल्योक लौकर गेला... ह्या हडळीचा पायगुणचं चांगला न्हाय... आता आम्ही नांदवणार न्हाय ह्या कैदासिनीला, ही ब्याद घेऊन जा.' अशा प्रकारे अपशकुनीचा शिक्का तिच्यावर कायमचा पडतो. कोणत्याही प्रकारचा वाईट प्रसंग घडला की, तुझ्यामुळेच घडला असे भावकी आणि नातलग उठवत तिला बोलू लागले.

पारूची धाकटी बहीण मीराचे लग्न पारूमुळे जमत नव्हते, त्यामुळे पारूचा आजा रंगा पावलागणिक तिचा शिव्या देऊन उद्धार करत असतो. एक दिवस समाजाचा विरोध झुगारून तो गाडीभर धान्य आणि रोख २०० रु.च्या बदल्यात तीन बायका मेलेल्या शहाजीसोबत पारूचे दुसरे लग्न लावून देतो. बघता बघता पारू तीन मुलांची आई होते. आता पारूच्या जीवनात कुठे आनंदाचे दिवस सुरू झाले असे वाटत असतानाच शहाजीचा मृत्यू होतो. इथेही भावकी तिलाच दोषी ठरविते आणि पारूच्या जीवनाची पुन्हा परवड सुरू होते. जिवावर उठलेली भावकी 'एक तर तू आमचे गाव सोडून जा नाहीतर तुझ्या मुलांना आम्ही मारून टाकू' अशी धमकी देऊ लागले. अशा चक्रव्यूहात अडकलेली पारू मुलांच्या काळजीपोटी आपल्या दुसऱ्या नवऱ्याचे गाव सोडते.

एकामागून एक न पेलणारी संकटे येऊनसुद्धा पारू पुन्हा उभी राहण्याचा प्रयत्न करते. समाजाच्या वखवखलेल्या नजरा, एकटी बाई पाहून चारित्र्यावर घेतला जाणारा संशय निधड्या छातीने झेलत, कमरेला विळा खोचून येणाऱ्या प्रत्येक संकटावर मात करते. मजल दरमजल करत पोट भरण्यासाठी संघर्ष करते, भीक न मागता कामाच्या शोधात भटकते, वेळप्रसंगी पाणी पिऊन दिवस काढते, नंदीवाल्याच्या पालावर मुक्काम करते, एक रात्रीसाठी एका मुस्लीम कुटुंबाचा आधार घेते. आणि एक दिवस तिला भेटते येवले मावशी; ना नात्याची ना गोत्याची...

पारूच्या अंतर्मनाचा शोध घेऊन, भविष्याच्या दृष्टीने विचार करून येवले मावशी पन्नाशीत असलेल्या रामासोबत पारूचे तिसरे लग्न लावून देते. तिसरे लग्न,



Scanned with OKEN Scanner

तिसरी चूल, तिसरे सासर, तिसरा गाव, तिसरा नवरा परंतु पारूचे जीवन मात्र स्थिर होत नाही, पोटासाठी वेगवेगळ्या ठिकाणी भटकंती करावी लागते. दुष्काळ, गरिबी आणि टोमण्यांचा भडिमार यामुळे पारूच्या जीवनात सुखाचे क्षण जास्त काळ वास्तव्य करू शकत नाहीत; आणि अशातच बब्बूचा म्हणजे लेखकाचा जन्म होतो.

आता जीवनातला अंधार दूर होईल आणि आयुष्यात उजेड येईल असे वाटायला लागते, पण पोटासाठीची वणवण थांबत नाही, परिस्थितीशी असलेला झगडा थांबायचे नाव घेत नाही. पारूच्या संघर्षाचे स्वरूप सांगताना लेखक म्हणतो की, 'माझी निरक्षर आई मात्र एकटीच आमच्या गरिबीचं दप्तर घेऊन दुसऱ्याच्या रानावनात कष्टाची मुळाक्षरे गिरवीत होती, दररोज वेगवेगळ्या परीक्षा देत होती. आज ह्याच्या बांधावर, उद्या त्याच्या बांधावर. गावात असं एकही वावर नव्हतं, तिथं आई कामाला गेली नसल. गावच्या तीनही बाजूंचा असा एकही डोंगर नसेल, जो तिच्या पायांना ओळखत नव्हता. मी जरी प्राथमिक शाळेत शिकत होतो; पण माझी आई जगण्यावर पीएच.डी. करीत होती.' हे एक वाक्य पारूच्या संपूर्ण संघर्षाचे सार आहे. पारूची ही झुंज केवळ उपजीविकेसाठी नाही, तर मानसिक, सामाजिक, आर्थिक आणि भावनिक सन्मानासाठीची झुंज आहे. ती कोणत्याही प्रसंगी आत्महत्या करत नाही, कुठेही हार मानत नाही. ती रडत नाही, तर लढते. संकटांशी दोन हात करत पुढे सरकते. आजूबाजूच्या स्त्रियांसाठी, विशेषतः हलाखीत जगणाऱ्या कुटुंबातील स्त्रियांसाठी ती एक प्रेरणास्रोत ठरते.

स्त्रीच्या आयुष्यात येणाऱ्या संकटांनादेखील काही मर्यादा असतात पण पारूच्या बाबतीत मात्र सर्व प्रकारचे भोग मर्यादा पार करताना दिसतात. आहे हे भोग किती तऱ्हेतऱ्हेचे असतात याचे वर्णन करणारी आणि एका स्त्रीच्या जगण्याची हकिकत मांडणारी ही कादंबरी आहे. आयुष्याच्या लढाईत वारंवार पराभूत होत असतानादेखील पुन्हा नव्या जिद्दीने मार्ग काढणारी, समोर येईल त्या परिस्थितीला खंबीरपणे तोंड देणारी असामान्य व्यक्तिरेखा पारूच्या रूपाने वाचकांसमोर उभी राहते.

आज आपण आपल्या आजूबाजूला पाहतो की, अगदी छोट्या छोट्या कारणावरून पती-पत्नीमध्ये भांडणे होतात, भांडणे विकोपाला जाऊन संसार तुटतात, परंतु 'एक भाकर तीन चुली'मधील पारूचा संघर्ष पाहून सर्व प्रकारची दुःखे अगदीच किरकोळ वाटतात. कादंबरीत असे अनेक प्रसंग पाहावयास मिळतात, की ज्यातून जगण्याचा प्रचंड आशावाद निर्माण होतो. बाईपणाच्या जगण्याची परवड आजवर कोणत्याच कालखंडात थांबलेली नाही आणि आजही थांबायचे नाव घेत नाही. पुरुषमनाचा प्रचंड पगडा आजही समाजमनावर कायम असलेला दिसून येतो,



Scanned with OKEN Scanner

शिवाय भाऊबंदकीची विकृत मनोवृत्ती हा आपल्या समाजव्यवस्थेला लागलेला शाप म्हटले तरी हरकत नाही.

आजही आपल्या आजूबाजूला म्हणण्यापेक्षा आपल्यात अशी कित्येक उदाहरणे आहेत. पोटच्या मुलाच्या, मुलीच्या किंवा रक्ताच्या चुलत भावाच्या मुलीच्या आयुष्यात आलेल्या अनपेक्षित संकटाच्या वेळी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे न राहता, त्यांना साथ न देता, जुनाट परंपरांच्या नावाखाली कोणतीही दया-माया न दाखवता त्यांचा छळ केला जातो. ही अघोरी मनोवृत्ती आजही आपल्यात आहे. त्यामुळे प्रस्तुत कादंबरी वाचत असताना भूतकाळाबरोबर आपल्या आजूबाजूच्या वर्तमान व्यक्तिरेखांचे संदर्भ डोळ्यांसमोर उभे राहतात. एका संकटातून सावरण्याआधीच दुसरे संकट पारूचे स्वागत करण्यासाठी तयार असताना ती हतबल होत नाही, जीवनात कधी हरताना दिसत नाही. कादंबरी वाचत असताना कित्येक वेळा असे वाटते की ती आता आत्महत्या करेल, मग आत्महत्या करेल, पण प्राप्त परिस्थितीसमोर ती कुठेही लोटांगण घालताना दिसत नाही. बोटावर मोजण्याइतपत चांगली लोकं तिला आयुष्यात भेटत गेली आणि ती लढत राहिली. परिस्थितीसमोर हतबल होणाऱ्या स्त्रियांना ती दाखवून देते की, 'परिस्थिती कितीही बिकट आली तरी रडायचं नाही तर लढायचं.' काळीज पिळवटून टाकणारी ही कादंबरी केवळ स्त्रियांनाच नाही तर परिस्थितीसमोर हतबल झालेल्या घटकाला नक्कीच प्रेरणा देणारी आहे.

आजही आपल्या समाजात अशा पारूसारख्या कितीतरी स्त्रिया आहेत. घरातच नव्हे तर समाजात, अशा स्त्रियांच्या आयुष्यावर कोणाचेही स्वामित्व नसते, पण सर्वांचा हक्क चाललेला असतो. ही कादंबरी त्या सर्वांचे प्रतिनिधित्व करते. 'एक भाकर तीन चुली' ही कादंबरी वास्तव, संघर्ष, जिद्द आणि आशावाद या साऱ्यांची सांगड घालते. पारूच्या रूपाने उभी राहिलेली ही व्यक्तिरेखा सामान्य नसून असामान्य आहे. ती प्रत्येकाला जगण्याची उमेद देते. प्रस्तुत कादंबरीमध्ये सामाजिक जाणिवा, वास्तवदर्शी शैली, आणि कथानकातील सच्चेपणा यांचा सुरेख मिलाफ दिसतो. म्हणूनच 'एक भाकर तीन चुली' ही आजच्या काळातली सर्वोत्कृष्ट आणि सर्वात जास्त वाचकांचा प्रतिसाद लाभलेली कलाकृती आहे.

**पुस्तकाचे नाव** : एक भाकर तीन चुली
**लेखक** : देवा झिंजाड
**प्रकाशक** : न्यू ईरा पब्लिशिंग हाउस, पुणे.
चौथी आवृत्ती, जुलै २०२४

■



Scanned with OKEN Scanner